संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणुकांमधील रोख रकमेचा नवा उच्चांक

**निवडणुका** आल्या की कायकाय गोष्टी घडतात याची भली मोठी यादी करता येऊ शकते. परंतु निवडणुका म्हटल्या की पैसा हे समिकरण इतके पक्के झाले आहे की पैशाचा पाण्यासारखा वापर हे त्याचे प्रमुख लक्षण ठरले आहे. विशेषतः राजकीय पक्षांकडून पैशांचा प्रचंड वापर होतो. यासाठी निवडणुक आयोगाने आचारसंहिता आणली. ज्यायोगे पैशाचा वापर मर्यादित होईल असा प्रयत्न करून पाहिला. परंतु त्याला कोणतेही मोठे यश आलेले नाही असे म्हणण्याची वेळ येते. कारण आता प्रत्यक्ष रिझर्व्ह बँकेनेच निवडणुकीपूर्वी देशात रोख रकमेचा प्रचंड वापर होतो. कारण बँकांमधून रोख रक्कम काढण्याचे प्रमाण वाढते. ही गोष्ट लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकांपूर्वी परंपरेने घडत आली आहे. याहीवेळेला तो प्रकार होतो आणि आता लोकसभा निवडणुकीपूर्वी देशातील रोख रकमेचे प्रमाण १८.३ टक्क्यांनी वाढले आहे. नोटबंदीपूर्वी रोख रकमेचा वापर हा संपूर्ण देशभरात १७.९७ लाख कोटींचा होता. आणि आता जानेवारी २०१९ ला तो तब्बल २०.६५ लाख कोटींवर जाऊन धडकला आहे. हा आतापर्यंतचा उच्चांक असल्याचे रिझर्व्ह बँकेच्याच आकडेवारीवरून दिसून येते. नोटबंदी म्हणजे निश्चलनीकरणाच्यावेळी लोकांच्या हातात साधारणपणे १८ लाख कोटीची रक्कम होती आणि रिझर्व्ह बँकेकडे तेवढीच रक्कम जमाही झाली होती. त्यानंतरच्या काळात देशातले रोख रकमेचे व्यवहार कमी व्हावेत म्हणून सरकारने अनेक प्रकारचे उपाय योजले. मोबाईल बँकिंग, मनी ट्रान्सफर, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड या गोष्टींचा जास्तीत जास्त वापर केला जावा. यासाठी काही प्रोत्साहन देणाऱ्या योजनाही सुरु केल्या गेल्या. लोकांकडून त्याला सकारात्मक प्रतिसादही मिळाला. गेल्या वर्षभरात म्हणजे २०१८ पर्यंत समाजात रोख रकमेऐवजी बँकिंग पध्दतीचा किंवा डिजीटायझेशनचा वापर केला गेला. कारण या गोष्टीमुळे काळाबाजार, भ्रष्टाचार या गोष्टींना आपोआपच आळा बसला. एवढेच नव्हे तर आर्थिक क्षेत्रातल्या कामांना गतीही मिळाली. सरकारच्या या धोरणाचे चांगले परिणाम दिसत असतानाच आता निवडणुकीच्या तोंडावर मात्र परंपरेने किंवा नेहमीप्रमाणे रोख रकमेचा वापर वाढल्याचे समोर आले आहे. हा बदल किंवा हे निरीक्षण नोंदवत असतानाच या गोष्टीला आळा बसेल याचा मात्र रिझर्व्ह बँकेकडे कोणताही उपाय दिसत नाही.

### रिझर्व्ह बँकेचे शिक्कामोर्तब

खरे तर केवळ दोन वर्षामध्ये रोख रकमेचा वापर तब्बल तीन लाख कोटींनी वाढावा ही अतिशय चिंताजनक गोष्ट ठरते. आता इतक्या मोठ्या प्रमाणात बँकांमधून रोख रक्कम काढली जाते. याच्यामागची कारणे काय असावीत. हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. निवडणुकांचा खर्च प्रचंड प्रमाणात असतो. कारण मतदारांना पैसे देण्यापासून ते वेगवेगळ्या प्रचार साहित्याचा किंवा माध्यमांचा वापर करताना रोख रक्कमच मोठ्या प्रमाणात उपयोगात आणली जाते कारण आचारसंहितेमुळे हा खर्च कागदोपत्री दाखवता येत नाही. हा त्यातला महत्वाचा भाग असतोच त्याशिवाय राजकीय पक्षांकडून मतदारांना आकर्षित करण्याकरीता ज्या काही विविध प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्या वापरल्या जातात तिथले व्यवहारसुध्दा रोख रकमेतून केले जातात. हा सगळा प्रकार पाहिल्यानंतर भारतात लोकशाहीच्या नावाने चालणारा निवडणुकीचा बाजार किती महागडा किंवा खर्चिक आहे. हे या उदाहरणावरून स्पष्ट होते. विशेष म्हणजे गेली अनेक वर्षे हा प्रकार सुरु असताना एकाही राजकीय पक्षाने किंवा समाजातल्या विचारवंतांनी एकत्र येऊन निवडणुकीतला हा पैशाचा भडीमार थांबावा म्हणून प्रयत्न केलेला दिसून येत नाही. एकीकडे आपला देश विकसनशील आहे किंवा देशातील चाळीस टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली राहाते. तिथे पैशाचा अशा पध्दतीने चुराडा व्हावा हे आणखीनच विपरित आणि आश्चर्यकारक म्हणावे लागते. नेमक्या निवडणुकीपूर्वीच अशा प्रकारे रोखरकमेचा वापर वाढत असेल आणि त्याचा पुरवठा करणे रिझर्व्ह बँकेला भाग पडत असेल तर ही गोष्टदेखील एकूण देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी धोकादायकच म्हणायला हवी. जिथे कमीत कमी रोख रकमेचा वापर व्हावा असा कसोशीने प्रयत्न होतो. किंवा सामान्य माणसाने बँकिंग पध्दतीचाच वापर करून व्यवहार करावेत असा आग्रह धरला जातो त्याचठिकाणी राजकीय पक्षांकडून मात्र जर निवडणुकीच्या काळात रोख रक्कम इतक्या मोठ्या प्रमाणात वापरली जावी हे चांगल्या अर्थव्यवस्थेचे किंवा समाजव्यवस्थेचेही उदाहरण ठरत नाही.

### सरकारने पुढाकार घ्यावा

आता मात्र या गोष्टीची गंभीरपणे दखल घेण्याची वेळ आली आहे. कारण हा उच्चांक असल्याचे रिझर्व्ह बँकेच्याच आकडेवारीतून दिसून येते आणि हा उच्चांक निश्चितच धक्कादायक ठरतो. तीन लाख कोटींची रोकड चलनामध्ये यावी आणि त्याचे संभाव्य दुष्परिणामही रिझर्व्ह बँकेनेच समाजाच्या लक्षात आणून दिले पाहिजे. दर निवडणुकीत तर हे हमखास घडते की कोट्यवधीची रोकड राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून जप्त केली जाते. याचाच अर्थ ऐन निवडणुकीच्या काळात रोख रक्कम उपलब्ध होणार नाही म्हणून राजकीय पक्ष त्यांचे नेते, कार्यकर्ते एवढेच नव्हे तर त्यांना देणग्या देणारे अनेक व्यापारी आणि उद्योजकही रोख रकमेचाच पर्याय निवडतात. त्यांनादेखील दिलेल्या या देणग्या कोणत्याही हिशेबात येऊ नये असे वाटत असते. या सर्व घडामोडींचा परामर्ष एवढाच निघतो की निवडणुकांमध्ये काळ्या पैशाचा सर्वाधिक वापर होतो आणि त्या सगळ्या काळ्या व्यवहारांसाठी या रोख रकमाच उपयोगी पडतात. आता तर रिझर्व्ह बँकेने निवडणुकांपूर्वी रोख पैसा वापरला जात असल्याचे मान्य केले आहे, आता समाजातल्या अर्थतज्ज्ञांची ही जबाबदारी ठरते. की हा वापर कमी कसा होईल किंवा निवडणुका अधिक पारदर्शीपणे कशा लढल्या जातील. खरे तर सरकारनेच त्यासंदर्भात पुढाकार घ्यायला हवा आणि ज्या काळ्या पैशाच्या विरोधात नोटबंदी घडवून आणली होती त्याच काळ्या बाजाराचा निवडणुकांमधला वापर रोखण्याचा प्रयत्न करावा.